महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ १२ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १९७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### लोकशाही हवी ; की फक्त तिचे हक्क?

लोकशाही व्यवस्थेत नागरिकांचे हक्क जितके महत्त्वाचे, तितकीच त्यांची कर्तव्येही अनिवार्य आहेत. मात्र आजच्या सामाजिक आणि राजकीय वास्तवाकडे पाहिले, तर "माझा हक्क" ही जाणीव ठळक दिसते; पण "माझे कर्तव्य" ही भावना मात्र अनेकदा दुय्यम ठरते. रस्त्यावर उतरताना, कार्यालयात काम करताना, कर भरताना किंवा निवडणुकीसारख्या लोकशाही प्रक्रियेत सहभागी होताना ही विसंगती प्रकर्षाने जाणवते. मतदानाचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समानतेचा अधिकार याबाबत आपण अत्यंत जागरूक आहोत. हे हक्क अबाधित राहावेत, यासाठी आंदोलनं होतात, चर्चा रंगतात. मात्र याच हक्कांना बळ देणाऱ्या कर्तव्यांकडे मात्र दुर्लक्ष होताना दिसते. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने नागरिकांची सेवा अधिग्रहित केली, तर त्याकडे अनेकजण सक्ती, त्रास किंवा अन्याय म्हणून पाहतात. प्रत्यक्षात हीच लोकशाही टिकवण्यासाठी आवश्यक असलेली सामूहिक जबाबदारी असते.

लोकशाही ही केवळ मतदानाच्या दिवशी मत टाकण्यापुरती मर्यादित नसते. ती पारदर्शक, निष्पक्ष आणि विश्वासार्ह राहावी यासाठी हजारो अधिकारी-कर्मचारी, शिक्षक, कर्मचारी काम करतात. त्यांचा सहभाग हा व्यवस्थेचा कणा असतो. अशा वेळी कर्तव्य टाळणे म्हणजे केवळ प्रशासनालाच नाही, तर लोकशाही प्रक्रियेलाच अडथळा निर्माण करणे होय. हक्कांची मागणी करणारा नागरिक कर्तव्यांपासून दूर राहिला, तर ती लोकशाही एकांगी आणि कमकुवत ठरते. प्रशासनाकडून कधी कठोर पावले उचलली जातात, त्यावर टीका होते. मात्र ही कठोरता कुठल्या तरी सूडभावनेतून नव्हे, तर व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी असते, हेही समजून घेणे गरजेचे आहे. कायदा सर्वांसाठी समान असेल, तर कर्तव्यांबाबतही अपवाद असता कामा नये. अन्यथा 'मी नाही, तू कर' अशी मानसिकता रुजते आणि संपूर्ण यंत्रणाच कोलमडण्याची शक्यता निर्माण होते.

आज गरज आहे ती हक्क आणि कर्तव्य यांच्यात समतोल साधण्याची. हक्कांशिवाय कर्तव्ये अन्यायकारक ठरतात आणि कर्तव्यांशिवाय हक्क केवळ मागण्या बनून राहतात. नागरिक म्हणून आपली भूमिका केवळ लाभ घेणाऱ्याची नसून, व्यवस्थेला चालना देणाऱ्याचीही आहे, ही जाणीव अधिक दृढ होणे आवश्यक आहे. लोकशाही टिकवायची असेल, तर हक्कांची जाणीव जितकी तीव्र आहे, तितकीच कर्तव्यांची जाणीवही अंगी बाणवली पाहिजे. अन्यथा प्रश्न कायम राहील—आपल्याला खरंच लोकशाही हवी आहे, की फक्त तिचे हक्क?

# महापालिका निवडणुकींसाठी ठाकरे बंधूंची संयुक्त सभा



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : राज्यात सुरू असलेल्या महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत मुंबईत शिवसेना ठाकरे गट आणि मनसेची संयुक्त सभा पार पडली. या सभेत बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार टीका केली. भाजपचे हिंदुत्व ढोंगी असल्याचा आरोप करत काश्मीरमधील घटनांपासून ते पाकिस्तानसोबतच्या क्रिकेट सामन्यांपर्यंत विविध मुद्द्यांवर त्यांनी सत्ताधाऱ्यांना सवाल केले.

उद्धव ठाकरे यांनी ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांवरूनही भाजपवर निशाणा साधला. आरोपांसाठी पुरावे दिले असतील तर त्यावर कारवाई करा, अन्यथा संबंधितांची माफी मागावी, असे आव्हान त्यांनी दिले. तसेच, लोकांना बदनाम करण्याचे राजकारण सुरू असल्याचा आरोप करत त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट चर्चेचे आव्हान दिले. यावेळी त्यांनी अप्रत्यक्षपणे शिवसेना शिंदे गटावरही टीका केली. या सभेत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनीही भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. ईव्हीएम आणि दुबार मतदानाच्या मुद्द्यावरून त्यांनी शंका उपस्थित करत, दुबार मतदान रोखण्यासाठी सतर्क राहण्याचे आवाहन केले. महापालिका निवडणूक मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी निर्णायक असल्याचे सांगत, मराठी माणसाने एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले.

महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गट, मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची युती झाली असून, या पार्श्वभूमीवर आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण अधिक तीव्र होत असल्याचे चित्र आहे. प्रचाराचा वेग वाढत असताना, येत्या काळात राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

> **"ही निवडणूक मराठी माणसासाठी शेवटची आहे. आज चुकला तर कायमचा मुकला. आज ही शहरं त्यांच्या हातात गेली तर उद्या राजाने मारलं आणि पावसाने झोडलं तर तक्रार कुणाकडे करायची? त्यामुळे हे सर्व सोडा, मराठी माणसासाठी एक व्हा, मुंबईसाठी एक व्हा, महाराष्ट्रासाठी एक व्हा,**
> ● राज ठाकरे

## केडीएमसी निवडणूक प्रशिक्षणाकडे दुर्लक्ष : पवार पब्लिक स्कूलच्या ८० कर्मचाऱ्यांवर गुन्हा!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**(वार्ताहर)**

**कल्याण दि.11 :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६चे कामकाज पारदर्शक रितीने व सुरळीतपणे व विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी यांनी शासकीय, निमशासकीय अधिकारी/ कर्मचारी, शाळा, महाविद्यालय यांचे आस्थापना वरील शिक्षक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांची सेवा अधिग्रहित केलेली आहे.

या निवडणूक कामकाजाकरिता पवार पब्लिक स्कूल, पलावा डोंबिवली (पूर्व) या शाळेतील एकूण 80 कर्मचारी वर्गास निवडणूक कामकाजाकरिता आदेश बजावण्यात आले होते. तसेच संबंधितास वेळोवेळी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून निवडणूक कर्तव्यावर हजर होण्याकरीता कळविण्यात आले होते, असे असतानाही सदर शाळेचे कर्मचारी हे आजपावेतो निवडणूक कामकाजासाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहिलेले नाहीत, त्यामुळे निवडणूक कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी महापालिकेचे सहा. आयुक्त संदीप रोकडे यांनी पवार पब्लिक स्कूल, पलावा डोंबिवली या शाळेतील 80 कर्मचारी वर्गावर भारतीय न्यायसंहिता 2023 ते कलम 223 अन्वये गुन्हा दाखल केला आहे .सदर कारवाई अतिरिक्त आयुक्त श्री. हर्षल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आली, अशी माहिती महापालिका उपायुक्त वंदना गुळवे यांनी दिली आहे.

> **दिनांक 15 व 16 जानेवारी 2026 रोजी असलेल्या निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेले अधिकारी कर्मचारी गैरहजर राहिल्यास त्यांचेवरही कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशारा महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी दिला आहे.**

## आगरी समाजावरील कथित ध्वनीफीत प्रकरणी तक्रारींचा पाऊस

### खा. बाळ्यामामा पोलीस ठाण्यात दाखल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ठाणे महापालिकेतील माजी महापौर तसेच शिंदे गटाच्या पदाधिकारी मीनाक्षी शिंदे यांच्याशी संबंधित आगरी समाजाविषयी कथित आक्षेपार्ह ध्वनीफीत समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर आगरी समाजातील विविध व्यक्तींकडून ठाण्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांत तक्रारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

या प्रकरणी भिवंडीचे राष्ट्रवादी (शरद पवार गट) खासदार बाळ्या मामा हे देखील कापूरबावडी पोलीस ठाणे येथे उपस्थित होते. मात्र, या प्रकरणी अद्याप कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

दरम्यान, संबंधित ध्वनीफीत ही बनावट असून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून विरोधकांनी आपली बदनामी करण्याचा कट रचल्याचा आरोप मीनाक्षी शिंदे यांनी केला आहे. समाजमाध्यमांवर व्हायरल झालेल्या या ध्वनीफीतीशी आपला कोणताही संबंध नसल्याचा दावाही त्यांनी केला आहे. या कथित ध्वनीफीतीच्या पार्श्वभूमीवर आगरी समाजातील विविध व्यक्तींनी प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी करत तक्रारी अर्ज सादर केले आहेत. पोलीस प्रशासनाकडून या तक्रारींची प्राथमिक छाननी सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.



> **आगरी समाजावर केलेली खालच्या पातळीवरील टीका आम्ही अजिबात खपवून घेणार नाही. मीनाक्षी शिंदे यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध करत असून समाजाचा अपमान करणाऱ्यांविरोधात कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.**
> ● खासदार बाळया मामा

# महापालिका रणधुमाळी शिगेला!

## मुंबई महानगर क्षेत्रात प्रचाराचा शेवटचा झंझावात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**वार्तहर / दि. 11**

मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, नवी मुंबई, मीरा-भाईंदर आणि वसई-विरार येथील महापालिका निवडणुकांचा प्रचार अंतिम टप्प्यात दाखल झाला असून संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्रात राजकीय वातावरण तापले आहे. प्रत्येक प्रभागात सकाळपासून रात्री उशिरापर्यंत प्रचार फेऱ्या, घरभेटी, कोपरा सभा आणि बैठकींचा धडाका सुरू असून उमेदवार व पक्षांनी शेवटच्या क्षणापर्यंत मतदारांवर पकड मजबूत करण्यासाठी संपूर्ण ताकद पणाला लावली आहे.

रस्ते, चौक, वसाहती आणि बाजारपेठांमध्ये प्रचाराचे फलक, घोषणा आणि कार्यकर्त्यांची लगबग दिसून येत असून पाणी, वाहतूक, अतिक्रमण, स्वच्छता आणि विकासकामांच्या मुद्द्यांवर आश्वासनांची सरबत्ती सुरू आहे. काही प्रभागांमध्ये नवख्या उमेदवारांनी अनुभवी नेत्यांना दिलेले आव्हान, तर काही ठिकाणी कुटुंबीयांमधीलच राजकीय लढतींमुळे प्रचार अधिकच रंगतदार बनला आहे. महिलांची आणि तरुणांची वाढती उपस्थितीही निवडणूक रणधुमाळीला वेगळेच वळण देत आहे.

सर्व महापालिका क्षेत्रांमध्ये प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. प्रत्येक प्रभागात उमेदवारांकडून सकाळपासून रात्री उशिरापर्यंत प्रचार फेऱ्या, घरभेटी, बैठका आणि कोपरा सभा सुरू आहेत. सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांनी प्रचारात आघाडी मिळवण्यासाठी आपली संपूर्ण ताकद पणाला लावली असून, पोस्टर, बॅनर, फ्लेक्स आणि समाजमाध्यमांच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा जोरदार प्रयत्न केला जात आहे. घराघरांत जाऊन मतदारांशी थेट संवाद साधताना स्थानिक प्रश्न, रखडलेली विकासकामे, पाणीपुरवठा, वाहतूक कोंडी, अतिक्रमण, स्वच्छता आणि नागरी सुविधा यांसारख्या मुद्द्यांवर आश्वासनांची खैरात सुरू असल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी प्रचाराच्या घोषणा, कार्यकर्त्यांची लगबग आणि प्रचार साहित्यामुळे रस्ते, चौक, वसाहती व बाजारपेठांमध्ये निवडणुकीचे वातावरण स्पष्टपणे जाणवत आहे.

काही प्रभागांमध्ये एका कुटुंबातील दोन-तीन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याने चर्चेला उधाण आले आहे, तर काही ठिकाणी नवख्या उमेदवारांनी अनुभवी नेत्यांना थेट आव्हान दिल्याने राजकीय समीकरणे बदलताना दिसत आहेत. प्रचारात महिलांची व तरुणांची वाढती उपस्थिती विशेष लक्ष वेधून घेत असून, मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब केला जात आहे

### प्रचारातील ठळक मुद्दे

- पुनर्विकास प्रकल्पांचा रखडलेला वेग
- झोपडपट्टी पुनर्वसन, वाहतूक कोंडी
- पावसाळी पूरस्थिती, रस्त्यांची दुरवस्था
- अनियंत्रित बांधकामे
- ट्रॅफिक जाम, पार्किंगचा प्रश्न
- वाढती कर आकारणी पाणीटंचाई
- रस्ते व ड्रेनेजचा बोजवारा
- बेकायदा बांधकामे, फेरीवाले
- अपूर्ण विकासकामे
- वाहतूक कोंडी
- पाणीपुरवठ्याचा गंभीर प्रश्न
- कचरा व्यवस्थापन

## महत्वाचे




### जीवनदीप महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीची राष्ट्रीय बेंच प्रेस स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**गोवेली :** जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथील विद्यार्थिनी कु. रितिका अवेरे हिने राष्ट्रीय स्तरावरील बेंच प्रेस स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आहे. दि. ७ ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान फरीदाबाद (हरियाणा) येथे पार पडलेल्या राष्ट्रीय बेंच प्रेस स्पर्धेत कु. रितिका अवेरे हिने ५७ किलो वजन गटात सहभाग घेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडवींदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ तसेच सर्व प्राध्यापक वर्गाने तिचे अभिनंदन करत पुढील क्रीडा कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. रितिकाच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, विद्यार्थ्यांसाठी ती प्रेरणास्थान ठरत आहे.

### मनसेचे मनोज घरत यांचा भाजपात प्रवेश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असताना कल्याण-डोंबिवलीतील राजकीय हालचालींना वेग आला आहे. प्रभागांतील प्रचार शिगेला पोहोचलेला असतानाच मनसेचे माजी डोंबिवली शहराध्यक्ष मनोज घरत यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह रविवारी भाजपा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. निवडणुकीच्या रिंगणातून भाजपाचे उमेदवार महेश पाटील यांच्या विरोधातील उमेदवारी घरत यांनी माघार घेतली होती. त्याचवेळी ते भाजपात प्रवेश करणार असल्याची चर्चा होती. घरत हे भाजपात गेल्याने मनसे पक्षाला ही मोठी हानी असल्याचे बोलले जातं आहे.




## टीडीसीसी बँक भरतीला उच्च न्यायालयाचा दणका

# नियुक्त्यांवरील स्थगिती कायम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता/दि.11**

**ठाणे :** ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (टीडीसीसी) यांच्या २०२५ मधील नोकरभरती प्रक्रियेत कोणत्याही पदनियुक्त्या न करण्याचा आदेश उच्च न्यायालयाने पुढील सुनावणीपर्यंत कायम ठेवला आहे.

ठाणे व पालघर जिल्ह्यातील शेतकरी व कष्टकऱ्यांची बँक म्हणून ओळख असलेल्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ऑगस्ट २०२५ मध्ये १६५ पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करून भरती प्रक्रिया सुरू केली होती. या भरतीसाठी वर्कवेल इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड या खासगी कंपनीची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व अनियमितता झाल्याच्या तक्रारी समोर आल्या.

या पार्श्वभूमीवर, भरती प्रक्रियेची सखोल चौकशी करून ती रद्द करावी व नामांकित संस्थेमार्फत नव्याने भरती प्रक्रिया राबवावी, अशी मागणी गोपाल पाटोळे यांच्यासह अन्य काही अर्जदारांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून केली होती. वकील सुगंध देशमुख व वैभव थोरवे यांच्यामार्फत ही याचिका दाखल करण्यात आली. न्यायमूर्ती सुमन श्याम व न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठासमोर याचिकेवर नुकतीच सुनावणी झाली. यावेळी, पदनियुक्तीला देण्यात आलेला स्थगितीचा आदेश पुढील सुनावणीपर्यंत कायम ठेवण्याचा निर्णय खंडपीठाने दिला.

दरम्यान, वर्कवेल इन्फोटेकसह इतर काही कंपन्यांविषयी अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर सहकार विभागाने ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी शासन निर्णय जारी करून संबंधित कंपनीसह काही कंपन्यांना भरती प्रक्रिया राबविणाऱ्या पॅनलमधून वगळले होते, अशी माहितीही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली.



# भिवंडीतील संवेदनशील मतदान केंद्रांचा प्रशासनाकडून आढावा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** राज्यात संवेदनशील शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भिवंडी शहरात येत्या 15 जानेवारी रोजी सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान होणार आहे त्यामुळे सध्या भिवंडी शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीचे पडघम जोमामध्ये वाजू लागले असून भाजप,शिवसेना, समाजवादी पक्ष,काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस ,महाराष्ट्र नवनिर्माण सेना, कोणार्क विकास आघाडी यांच्या सह विविध पक्ष,आघाडी व अपक्ष उमेदवारांकडून पदयात्रा प्रचार रॅली, कॉर्नर सभा जाहीर नागरी सभा घेऊन मतदारांशी संवाद साधला जात आहे हा करत असताना अनेक ठिकाणी पक्षीय मतभेद उफाळून आले आहेत. प्रचार सभा, रॅली, कॉर्नर मिटींग सभेदरम्यान विरोधी उमेदवारासोबत शिवीगाळ व बचावाची चे त्याचबरोबर हाणामारी सारखे प्रकार घडू लागल्यामुळे भिवंडीतील विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल होण्याचे प्रकार सुद्धा वाढीस लागू लागले आहेत.त्यामुळे पोलीस व महापालिका निवडणूक विभागाचे प्रशासन अधिकारी सतर्क झाले असून त्यांनी ठिकठिकाणी बंदोबस्त गस्त सुरू केली आहे.

तसेच निवडणूक मतदान केंद्रांना महापालिका अधिकारी यांनी पोलीस पथकासह भेटी देऊन पाहणी करण्यास सुरुवात केली आहे.भिवंडीत ७१८ पैकी १५३ मतदान केंद्र हे संवेदनशील असून त्यांची सरासरी २१ टक्के एवढी आहे. यामध्ये शांतीनगर पोलीस ठाण्यातील ५८ या सर्वाधिक संवेदनशील मतदान केंद्रांचा समावेश होत आहे. त्यामुळे पोलिसांनी या केंद्राचा आढावा घेऊन बंदोबस्त ठेवण्याची तयारी सुरू केली आहे. भिवंडीत निवडणूक कार्यकाळात अनेक ठिकाणी हाणामारी, शाब्दिक बाचाबाची, शिविगाळ,दमदाटी,दहशत पसरविण्याचे प्रकार ठिकठिकाणी घडत असतात.त्यामध्ये शहरातील काही मतदान केंद्र इमारती व तेथील मतदान केंद्र हे पोलिस दप्तरी नेहमीच संवेदनशील असल्याने त्याठिकाणी पोलिस प्रशासना कडून विशेष खबरदारी घेत लक्ष ठेवण्यात येत आहे.

ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपआयुक्त शशिकांत बोराटे, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे, विजय मराठे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांची निवडणूक संदर्भात नुकतीच विशेष बैठक झाली आणि सर्व निवडणूक विभाग व केंद्राचा आढावा घेऊन बंदोबस्त ठेवण्यात संदर्भात चर्चा झाली आहे.भिवंडी शहरातील एकूण १७३ मतदान केंद्र इमारती मध्ये ७१८ मतदान केंद्रांमध्ये मतदान होणार आहे. यापैकी १४६ इमारतींमधील ५६५ मतदान केंद्र हे सर्वसाधारण असून २७ इमारतीं मधील १५३ मतदान केंद्र हे संवेदनशील आहेत.आय टी आय इमारत ईदगाह,हंडी कंपाऊंड,दरगाह रोड, आजमी नगर,टावरे कंपाऊंड,समद नगर,नवी बस्ती,भाग्य नगर,संगम पाडा, कोंबडपाडा,म्हाडा कॉलनी,बंदर मोहल्ला,भंडारी कंपाऊंड अशा विविध भागात हे संवेदनशील मतदान केंद्र असुन निवडणूक निर्णय अधिकारी व पोलिसांनी या केंद्राची सुरक्षा संदर्भात पाहणी करून आढावा घेतला आहे.

## वाचक मनोगत

### आश्वासनांचा बाजार आणि नागरी समस्यांची कायम रखडपट्टी

महापालिका निवडणूक जवळ आली की शहरात अचानक गजबज सुरू होते. रस्त्यांवर झेंडे लागतात, भिंतींवर चेहरे झळकतात, चौकाचौकात भाषणांचे फलक दिसू लागतात. उमेदवारांचे दरवाजे जनतेसाठी उघडतात आणि “आम्ही निवडून आलो की सर्व प्रश्न मार्गी लावू” अशी नेहमीची आश्वासने पुन्हा एकदा ऐकू येऊ लागतात. मात्र निवडणूक संपली की हीच आश्वासने कागदावरच राहतात, आणि नागरी समस्या मात्र जैसे थेच असतात. रस्त्यांची दुरवस्था, पाणीटंचाई, सांडपाणी व्यवस्था, कचरा प्रश्न, वाहतूक कोंडी, आरोग्य सुविधा — हे प्रश्न वर्षानुवर्षे नागरिकांना भेडसावत आहेत. प्रत्येक निवडणुकीत याच समस्यांवर बोलले जाते; पण उपाययोजना मात्र कधीच ठोस होत नाहीत. याला केवळ उमेदवार जबाबदार आहेत, असे म्हणणे तितकेसे योग्य ठरणार नाही. कारण या व्यवस्थेला अप्रत्यक्षपणे खतपाणी घालणारी मानसिकता आपलीच आहे.

निवडणुकीच्या काळात पैसे, दारू, भेटवस्तू यांचे आमिष दाखवून मत मागितले जाते. दुर्दैवाने अनेक नागरिक काही हजार रुपयांसाठी किंवा क्षणिक फायद्यासाठी आपले मत विकतात. लोकशाहीतील सर्वात पवित्र हक्क असलेले मतदान अशा प्रकारे सौदेबाजीचा विषय बनते. दुसरीकडे काही नागरिक “आपण मत दिलं तरी काय फरक पडतो?” असे म्हणत मतदानालाच जात नाहीत. ही उदासीनता आणि गाफीलपणा लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. मतदान न करणे किंवा पैसे घेऊन मतदान करणे, या दोन्ही गोष्टींचा परिणाम एकच — अकार्यक्षम नेतृत्व पुन्हा सत्तेत येते. मग पाच वर्षे तेच रस्ते, तेच खड्डे, तीच अस्वच्छता आणि तीच तक्रारी ऐकायला मिळतात. त्यानंतर पुन्हा निवडणूक येते आणि पुन्हा तोच आश्वासनांचा खेळ सुरू होतो. हे दुष्टचक्र कधी थांबणार?

महापालिका ही शहराच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित असलेली व्यवस्था आहे. येथे निवडून येणारे लोकप्रतिनिधी प्रामाणिक, जबाबदार आणि क ा म करणारे असतील तरच शहराचा खरा विकास होऊ शकतो. यासाठी उमेदवारांइतकीच जबाबदारी नागरिकांचीही आहे. भावनिक भाषणांवर, जात-पात, धर्म किंवा पैशांवर मतदान न करता, उमेदवाराचा कामाचा इतिहास, प्रामाणिकपणा आणि दृष्टीकोन पाहून निर्णय घेणे गरजेचे आहे. त्यामुळे आज गरज आहे जागरूक नागरिकांची. “आपलं शहर, आपली जबाबदारी” ही भावना मनात ठेवून प्रत्येकाने मतदान करणे, चुकीच्या गोष्टींना नकार देणे आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींना जाब विचारणे, हेच खरे लोकशाहीचे लक्षण आहे. अन्यथा आश्वासने बदलतील, चेहरे बदलतील; पण नागरी समस्या मात्र कायम तशाच राहतील. महापालिका निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव, असे म्हणायला आपण फार उत्सुक असतो. पण प्रत्यक्षात हा उत्सव कमी आणि आश्वासनांचा बाजार अधिक असतो. निवडणूक जाहीर होताच उमेदवारांचे चेहरे सर्वत्र झळकू लागतात. हात जोडले जातात, फोन येतात, भेटीगाठी वाढतात आणि एकच वाक्य वारंवार ऐकू येते — “निवडून आल्यानंतर सगळं ठीक करू.” प्रश्न इतकाच आहे की, आधी निवडून आले तेव्हा नेमकं काय केलं?

शहरातील नागरी समस्या आज अचानक निर्माण झालेल्या नाहीत. रस्त्यांवरील खड्डे, पाणीटंचाई, कचऱ्याचे ढीग, सांडपाण्याची दुर्गंधी, वाहतूक कोंडी — हे प्रश्न वर्षानुवर्षे तसेच आहेत. प्रत्येक निवडणुकीत याच समस्यांवर भाषणं होतात, घोषणा केल्या जातात, पण निवडणूक संपताच या समस्या पुन्हा दुर्लक्षित केल्या जातात. कारण निवडणूक ही अनेकांसाठी सेवेची संधी नसून सत्तेचा शॉर्टकट असते. या सगळ्याला केवळ उमेदवार जबाबदार आहेत का? दुर्दैवाने नाही. कारण पैसे घेऊन मतदान करणारा नागरिक आणि मतदानालाच न जाणारा नागरिक — हे दोघेही या सडलेल्या व्यवस्थेचे भागीदार आहेत. काही हजार रुपये, दारूची बाटली किंवा एखादी भेटवस्तू घेऊन लोकशाहीतील सर्वात मौल्यवान हक्क विकला जातो, आणि मग पाच वर्षे त्या चुकीची किंमत संपूर्ण शहराला मोजावी लागते.

**मंदार केळकर**
**डोंबिवली**

# दहावी-बारावीच्या परीक्षा केंद्रांवरील पर्यवेक्षक व केंद्र संचालकांची आदलाबदल करू नये - आ. ज्ञानेश्वर म्हात्रे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : प्रतिनिधी**

इ.10 वी,12 वीची परीक्षा कॉपीमुक्त पार पाडावी म्हणून पर्यवेक्षक व केंद्र संचालकांची अदलाबदल करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांच्या 100 कलमी कार्यक्रमांतर्गत घेण्यात आला होता. कोरोना काळ वगळून 2018, 2019, 2020 व 2023 आणि 2024 या काळातील परीक्षेच्या वेळी ज्या केंद्रावर गैरप्रकारांची प्रकरणे आढळले त्या केंद्रावरील पर्यवेक्षक व केंद्र संचालक बदलण्याचा निर्णय बोर्डाने घेतला आहे. फेब्रुवारी, मार्च 2025 च्या दहावी- बारावीच्या ज्या परीक्षा केंद्रावर गैरप्रकाराची प्रकरणे आढळले त्या केंद्रांची मान्यता कायमची रद्द केली जाईल असेही सांगितले आहे. दरवर्षी राज्यभरात कॉपीमुक्त अभियान राबवले जाते. प्रत्येक परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षक आणि केंद्र संचालक आता दुसऱ्या शाळा, महाविद्यालयातील असणार आहेत.

पाच ते सात किलोमीटर अंतराचे शाळांमधील शिक्षक विविध परीक्षा केंद्रावर परिवेक्षक असतील. वेळप्रसंगी जिल्हा परिषद व महापालिकेच्या शाळांमधील शिक्षकांची मदत घेतली जाणार आहे. परीक्षा केंद्रात त्याच शाळेतील शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी नको, पण हा निर्णय म्हणजे शिक्षक वर्गावर अविश्वास दाखविण्याचा प्रकार असून तो त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभा करणार आहे म्हणून हार निर्णय रद्द करावा अशी मागणी कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

कोकण विभाग शिक्षक मतदार संघ हा अत्यंत डोंगराळ, सागरी किनारपट्टीचा, दऱ्याखोऱ्याचा असून परीक्षा केंद्रावरील अंतर कमीत कमी 25 ते 30 किलोमीटरचे आहे. दोन परीक्षा केंद्रामधील अंतर जास्त असल्यामुळे शिक्षकांना होणारा प्रवासाचा त्रास पुरुषासह महिला शिक्षकांना देखील प्रशासकीय दृष्ट्या अडचणीचा ठरणारा आहे. कोकण विभागात प्रवासाची साधनेही अत्यल्प प्रमाणात आहेत.

परीक्षा केंद्रावर ये-जा करण्यास यामुळे खूप मोठी अडचण निर्माण होणार आहे. तरी सर्व बाबींचा गंभीर्याने विचार करून कोकण विभागासह राज्यातील इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षक व केंद्र संचालक यांची अदलाबदली करू नये व याकरिता काढलेला आदेश रद्द करावा अशी मागणी आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी केली आहे.

# कल्याण डोंबिवली महापालिकेच्या मतदान केंद्रांची माहिती फक्त एका क्लिकवर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या अनुषंगाने मतदारांना मतदान करणे सुलभ व्हावे, त्यांना आपल्या मतदान केंद्राची माहिती त्वरित उपलब्ध व्हावी, यासाठी महापालिकेमार्फत विशेष ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या ऑनलाईन सुविधेमार्फत मतदारांना त्यांचे नाव सर्च केल्यावर, मतदान केंद्राचे जीपीएस लोकेशनसह माहिती उपलब्ध होणार आहे. या माध्यमाद्वारे मतदारांना मतदान कोणत्या केंद्रात करावयाचे आहे, मतदार यादीचा भाग क्रमांक, अनुक्रमांक ही वैयक्तिक माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

मतदान क्रमांक व मतदान केंद्र शोधण्यासाठी मतदारांनी https:kdmc.localbody.org/Home/Voter_Search या लिंकचा किंवा QR Code चा वापर करावा. या सुविधेमुळे मतदारांना वोटर स्लिपवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही आणि घर बसल्या आपापल्या मतदान केंद्राची माहिती जीपीएस लोकेशनसह सहजरित्या उपलब्ध होईल.

यामुळे मतदान प्रक्रिया अधिकाधिक सुलभ व पारदर्शक होण्यास मदत होणार आहे.

# ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात मतदान जनजागृती अभियानास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (10) :** ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृती करण्यासाठी शहरातील विविध प्रभागांमध्ये स्वीप (SVEEP) उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मतदानाचा टक्का वाढावा तसेच जास्तीत जास्त नागरिकांनी लोकशाहीने दिलेला अधिकार बजावावा यासाठी ठाणे महापालिकेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आहे. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीपच्या नोडल अधिकारी डॉ. मिताली संचेती यांच्या सहकार्याने शहरातील विविध भागात दररोज जनजागृती सुरू आहे

दिवा प्रभाग समिती अंतर्गत दातीवली तलाव येथे स्वीप पथकामार्फत पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. या पथनाट्यातून नागरिकांना मतदानाचे महत्त्व, लोकशाहीतील सहभाग आणि जबाबदार मतदाराची भूमिका याविषयी प्रभावी संदेश देण्यात आला. या वेळी स्वीप पथकातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय मुंब्रा प्रभाग क्रमांक 26,30,31 व 32 मधील विविध ठिकाणी स्वीप टीममार्फत मतदान जनजागृती करण्यात आली. विशेषतः पेट्रोल पंप, बँका व भाजी बाजार अशा गर्दीच्या ठिकाणी नागरिकांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

तसेच, स्वीप उपक्रमांतर्गत मतदानाची शपथ भारतीय डाक विभागाच्या कळवा उपटपाल कार्यालय, प्रभाग क्रमांक २३ येथे घेण्यात आली. या कार्यक्रमास डाकघर प्रमुख श्रीमती शारदा पिल्ले मॅडम, कार्यालयातील कर्मचारी तसेच स्वीप पथकाचे सदस्य उपस्थित होते.

वागळे प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्रमांक 16,17,18 मधील सि. पी. तलाव, शांतिनगर व मस्जिद गल्ली परिसरातील शाळांमध्येही स्वीप पथकाने भेट देऊन विद्यार्थ्यांना व शिक्षकांना ‘मताधिकार’ ॲप विषयी माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती फेरी काढून परिसरात नागरिकांनाही मतदानाबाबत जागरूक केले. या सर्व उपक्रमांच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरिकांनी 15 जानेवारी रोजी मतदानाचा हक्क बजावावा, हा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात येत आहे.

# बदलापूरचे नगरसेवक तुषार आपटेंचा राजीनामा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर :** बदलापूर कुळगाव नगरपालिकेतील भाजपचे स्वीकृत नगरसेवक तुषार आपटे याने अवघ्या २४ तासांत नगरसेवकपदाचा राजीनामा दिला आहे. तुषार आपटे याची भाजपने शुक्रवारी स्वीकृत नगरसेवकपदी वर्णी लावली होती. त्यावरून मोठा गदारोळ झाल्याने भाजपच्या वरिष्ठांनी याची गंभीर दखल घेत झाडाझडती घेतली. त्यामुळे पक्षाच्या वरिष्ठांकडून स्पष्ट संदेश मिळाल्याने नामुष्की टाळण्यासाठी पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या चोवीस तासातच आपटे यांनी स्वीकृत नगरसेवकपदाचा राजीनामा दिला. पक्षाच्या आदेशानंतर वरिष्ठांकडे त्यांनी आपला राजीनामा दिला.

# ठाण्यात 176 मतदान केंद्र संवेदनशील

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** १५ जानेवारी रोजी होणाऱ्या ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासनाची जय्यत तयारी सुरू असून शहरात एकूण २ हजार १३ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. यापैकी १७६ मतदान केंद्रे संवेदनशील असल्याचे ठाणे महापालिकेच्या निरीक्षणात आढळून आले आहे. या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी संबंधित केंद्रांवर अतिरिक्त पोलिस फौजफाटा तैनात करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. निवडणुकीची तारीख जवळ येत असताना राजकीय पक्ष व उमेदवारांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. निवडणूक शांततेत व सुरळीत पार पडावी, यासाठी पालिका व पोलिस प्रशासनाने शहरातील ३३ प्रभागांमधील मतदान केंद्रांचे सखोल सर्वेक्षण केले.









# नाना टिळक प्राथमिक विद्यालयात गरीब गरजू विद्यार्थ्यांना ब्लँकेटचे वाटप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या नाना टिळक प्राथमिक विद्यालय वावोशी येथील गरीब गरजू विद्यार्थ्यांना विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून प्रभुदास घरत व धनाजी घरत यांच्या सौजन्याने ब्लँकेटचे मोफत वाटप करण्यात आले.

विश्व हिंदू परिषदेच्या वतीने आशाये चॅरिटेबल ट्रस्ट ,नाकोडा भैरव मंडळ लालबाग, वर्धमान संस्कृती सेवाधाम आणि कोलबा रोटरी बँक यांच्या सहकार्याने प्रभुदास घरत व धनाजी घरत सर यांच्या सौजन्याने विद्यार्थ्यांना मोफत ब्लँकेट चे वाटप करण्यात आले यावेळी शाळेचे मुख्याध्यापिका विद्या घरत सहशिक्षिका मानसी केदारे रिया वालम सुनील पवार यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जेष्ठ नागरीक आणि दिव्यांगांना मतदान केंद्रांवर विशेष सुविधा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 मध्ये अधिकाधिक मतदारांनी मतदान करावे, मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी महानगरपालिका स्वीप ॲक्टीव्हीटींच्या तसेच इतर उपक्रमांच्या माध्यमातून भगीरथ प्रयत्न करीत आहे. या निवडणूकीसाठी जेष्ठ नागरीक, दिव्यांग व्यक्ती यांना मतदान केंद्रांवर व्हीलचेअर्स, स्वयंसेवक, रॅम्प अशा सुविधा उपलब्ध दिल्या जाणार आहेत. त्याचप्रमाणे दिव्यांग व्यक्ती, जेष्ठ नागरीक यांना मतदान केंद्रावर मत नोंदविताना रांगेत उभे रहावयाची आवश्यकता नाही. तसे निर्देश सर्व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तरी दिव्यांग व्यक्ती, जेष्ठ नागरीक यांनी गुरुवार दि.१५ जानेवारी रोजी आपला मतदानाचा हक्क आवर्जुन बजवावा, असे आवाहन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे.

# डोंबिवली देवीचा पाड्यातील बेकायदा चाळी जमीनदोस्त करा - आयुक्त अभिनव गोयल यांचे आदेश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण - डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा भागातील स्मशानभूमी परिसर, मेंग्या आजो मंदिर आणि अनमोल नगरीच्या पाठीमागील बाजूतील मोकळ्या जागेत भूमाफियांनी एकूण सुमारे ३०० चाळींची बेकायदा बांधकामे रात्रंदिवस काम करून सुरू केली आहेत.**

यासंदर्भातची माहिती मिळताच कल्याण डोंबिवली पालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांनी देवीचापाडा आणि परिसरात सुरू असलेली बेकायदा चाळींची बांधकामे तातडीने जमीनदोस्त करून, त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश डोंबिवली पश्चिमेतील ह प्रभागाचे साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांना दिले आहेत. इतर प्रभागांचे साहाय्यक आयुक्त निवडणूक कर्तव्य पार पाडून नियमितची फेरीवाला हटविणे, बेकायदा बांधकामे तोडणे आणि इतर नागरी समस्यांची कामे मार्गी लावत आहेत. मग डोंबिवली पश्चिमेत अशी कर्तव्य कर्मचारी का पार पाडत नाहीत, असे प्रश्न तक्रारदार नागरिक उपस्थित करत आहेत. डोंबिवली पश्चिम हा कांदळवन जंगलाचा एकमेव हरितपट्टा शिल्लक आहे. विविध प्रकारची जैवविविधता डोंबिवली पश्चिम खाडी किनारी भागात आहे. भूमाफियांनी गेल्या दहा वर्षाच्या कालावधीत डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा, कुंभारखाणपाडा, सरोवरनगर, गणेशनगर, मेंग्या आजो मंदिर, अनमोलनगरी परिसर, देवीचापाडा स्मशानभूमी परिसरात पाच हजाराहून अधिक बेकायदा चाळी खाडी किनारा नष्ट करून, कांदळवनाचे जंगल भुईसपाट उभारल्या आहेत. डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा परिसरात बेकायदा चाळी उभारल्या जात असल्याबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

## भविष्यवेध



**सोमवार**
**12 जानेवारी 2026**

**मेष**
कामाचा ताण वाढेल. जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतील. संयम ठेवल्यास यश मिळेल. सर्जनशील कामात यश मिळेल. मित्रांचे सहकार्य लाभेल. खर्चावर नियंत्रण आवश्यक आहे.

**वृषभ**
भावनिक निर्णय टाळा. आर्थिक स्थिती सुधारेल. कौटुंबिक सौख्य मिळेल. नवीन जबाबदाऱ्या मिळतील. कामात यश मिळेल. आर्थिक व्यवहारात सावध राहा. कुटुंबाकडून पाठिंबा मिळेल.

**मिथुन**
गुप्त शत्रूंपासून सावध रहा. आर्थिक निर्णय पुढे ढकला. संयम फायदेशीर ठरेल. शिक्षण व करिअरमध्ये प्रगती होईल. नवीन ओळखी उपयोगी पडतील. दिवस उत्साहवर्धक आहे.

**कर्क**
कामाचा ताण जाणवेल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक स्थैर्य हळूहळू वाढेल. नवीन कल्पनांना यश मिळेल. सामाजिक कार्यात सहभाग वाढेल. खर्चाचे नियोजन करा. भावनिक स्थैर्य आवश्यक.

**सिंह**
कौटुंबिक आनंद मिळेल. मन अस्वस्थ राहू शकते. महत्त्वाचे निर्णय पुढे ढकला. नातेवाईकांकडून सहकार्य मिळेल. नवीन संधी मिळण्याची शक्यता. प्रवास यशस्वी ठरेल. आहे.

**कन्या**
स्थैर्य लाभेल. गुंतवणुकीसाठी दिवस अनुकूल नाही. संयम ठेवल्यास नातेसंबंध सुधारतील. कामानिमित्त प्रवास संभवतो. बोलण्यातून गैरसमज टाळा. मित्रांचे सहकार्य लाभदायक ठरेल.

**तुळ**
घरगुती प्रश्नांवर लक्ष द्यावे लागेल. खर्च वाढू शकतो. मानसिक शांतता राखणे आवश्यक. नेतृत्वगुणांना वाव मिळेल. अडकलेली कामे पूर्ण होतील. अहंकार टाळल्यास लाभ होईल.

**वृश्चिक**
कार्यक्षेत्रात बदल संभवतो. आरोग्याची काळजी घ्या. मेहनतीचे योग्य फळ मिळेल. भागीदारीत सावधगिरी ठेवा. कायदेशीर बाबींमध्ये यश मिळू शकते. कौटुंबिक आनंद वाढेल.

**धनु**
जुनी रखडलेली कामे मार्गी लागतील. नवे संपर्क लाभदायक ठरतील. प्रवासाचे योग आहेत. आरोग्याकडे लक्ष द्या. बोलण्यात संयम ठेवा. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील.

**मकर**
निर्णय घेताना भावनांवर नियंत्रण ठेवा. कामाच्या ठिकाणी प्रशंसा मिळेल. आत्मविश्वास वाढेल. महत्त्वाची कामे पूर्ण होतील. खर्च वाढण्याची शक्यता. वाद टाळल्यास दिवस चांगला जाईल.

**कुंभ**
आज कामात गती येईल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवा. कौटुंबिक वातावरण समाधानकारक राहील. आर्थिक व्यवहारात सावधगिरी आवश्यक. संयम ठेवल्यास यश मिळेल.

**मिन**
कामात अडथळे येऊ शकतात. संयम आणि मेहनतीने परिस्थिती सुधारेल. आरोग्याची काळजी घ्या. भागीदारीत लाभ संभवतो. सामाजिक सन्मान मिळेल. आर्थिक निर्णय विचारपूर्वक घ्या.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T. | B.Sc. CHEMISTRY, MATHS | B.A.F. | BAMMC | B.Com. | B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT | M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390








# मुंबईचा महापौर ठाकरे बंधू ठरवतील- जयंत पाटील यांनी गाजवलं शिवतीर्थ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शिवाजी पार्कवरील ठाकरे बंधूंच्या संयुक्त सभेला संबोधित केलं. उद्धव ठाकरेजी तुम्ही उशिरा आलात पण आक्रमक आणि मुद्देसूद भाषण आदित्य ठाकरेंचं मी ऐकलं, मुंबईची नस, मुंबईला काय पाहिजे, मुंबईला काय हवंय याची ओळ नं ओळं आदित्य ठाकरेंना माहिती आहे. उद्धवजी मुंबईची जबाबदारी आदित्य ठाकरेंकडे देऊन तुम्ही महाराष्ट्राकडे लक्ष द्यावं, असं जयंत पाटील म्हणाले.

आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्या शब्दामुळं मुंबई मराठी माणसाची ही भावना देशभर पसरली. ते होते या मुंबईत मराठी माणूस स्वाभिमानानं ठामपणे उभा राहिला हे महाराष्ट्रात कोणी विसरता कामा नये. आजच्या मंचावरील पोस्टर पाहून आनंद होतोय की भावकी एक झाली आहे. मुंबईत फिरलो लोकांना राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्याचा लोकांना आनंद झाला आहे. शिवतीर्थ भरलेय पण महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील माणूस बघतोय याचा राजकारणावर काय परिणाम होणार हे पाहतोय. तुम्ही दोघं एकत्र आलात यासाठी शरद पवार यांच्यावतीनं अभिनंदन करतो. पवारसाहेब येणार होते पण त्यांना जमलं नाही, त्यांनी मला यायला सांगितलं, असं जयंत पाटील म्हणाले. आम्ही नेहमी बाळासाहेब ठाकरे यांचं भाषण टीव्हीवर पाहायचो. तेच मैदान आहे, तिच शिवसेना आहे, मात्र शत्रू वेगळा आहे. काही गद्दार आहेत, तर काही दिल्लीतील सत्तेचे गुलाम आहेत. मला खात्री आहे की मुंबईकर या सगळ्यांना खड्यासारखं बाजूला ठेवल्याशिवाय राहणार नाही, असं जयंत पाटील यांनी म्हटलं.

19 जून 1966 ला या शिवतीर्थावर शिवसेनेची स्थापना झाली, त्याच वेळी माझे नेते शरद पवार यांनी बाळासाहेब ठाकरे यांचं भाषण इथल्याच एका कट्ट्यावर बसून ऐकलं होतं. बाळासाहेब ठाकरे यांचं नेतृत्त्व मुंबईसाठी आवश्यक आहे ही भावना शरद पवार यांनी राज्यभर बाळगली आहे. हे मैदान आपल्या अभिमानाचं हे मैदान आहे. शरद पवार यांनी याच मैदानावरुन पक्षाची स्थापना केली होती, असं जयंत पाटील म्हणाले.

साडे तीनशे वर्षांपूर्वी आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत लुटली त्याचा राग काहींच्या मनात आजही आहे हे विसरु नका, अशा अनेक गोष्टी आहेत. कालपरवा अण्णा मलाई येऊन गेले काय बोलले,त्यांची भूमिका अशी आहे की मुंबई ही महाराष्ट्राची नाहीये. मुंबई पुन्हा तोडण्याचा डाव सुरु झालेला दिसतोय, त्यामुळं आपण सावध व्हायला पाहिजे, असं जयंत पाटील म्हणाले.

## महेश कदम यांचे ठाण्यातील भाजपच्या स्थानिक नेतृत्वावर आरोप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण तापले असून पाचपाखाडी प्रभागात (क्रमांक १२) आरोप–प्रत्यारोपांना उधाण आले आहे. भाजपचे माजी पदाधिकारी आणि सध्या शिवसेना (ठाकरे गट) कडून उमेदवारी मिळवलेले महेश कदम यांनी भाजपच्या ठाण्यातील स्थानिक नेतृत्वावर गंभीर आरोप केले आहेत.

भाजपच्या सर्व नेत्यांनी पक्ष पूर्णपणे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या स्वाधीन केल्याचा आरोप कदम यांनी केला आहे. ‘काळजी करू नको, तुलाच तिकीट मिळेल’ अशी आश्वासने देऊन कार्यकर्त्यांची फसवणूक करण्यात आली, असा थेट आरोप त्यांनी भाजप नेतृत्वावर केला.

महेश कदम हे पूर्वी भारतीय जनता पक्ष मध्ये सक्रिय होते. मात्र उमेदवारी नाकारल्यानंतर त्यांनी शिवसेना (ठाकरे गट) मध्ये प्रवेश केला आणि तेथून निवडणूक रिंगणात उतरले आहेत. याच पार्श्वभूमीवर समाजमाध्यमांवर प्रसिद्ध झालेल्या एका मुलाखतीत त्यांनी भाजपच्या स्थानिक नेत्यांवर टीकेची झोड उठवली.

“पायऱ्यांवर पाय झिजवले, तर कुठेतरी तुमचा विचार केला जाईल,” अशी आश्वासने दिली गेली. मात्र प्रत्यक्षात शब्द फिरवण्यात आले, असा आरोप करत कदम यांनी भाजपच्या स्थानिक नेतृत्वावर ‘कार्यकर्त्यांना गृहित धरण्याची’ टीका केली. ठाण्यातील काही ‘शक्तिशाली’ नेत्यांनी स्वार्थासाठी कार्यकर्त्यांचा विश्वासघात केल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

या आरोपांमुळे ठाणे महापालिका निवडणुकीच्या प्रचारात राजकीय संघर्ष अधिकच तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

## वैर नाही पण ; खुर्चीसाठी स्पर्धा!

### नवी मुंबई महापालिकेत मंदा म्हात्रे आणि गणेश नाईकांमध्ये सत्ता-समीकरणांची चढाओढ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**दि.11/ठाणे -नवी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी आघाडीत असलेल्या पक्षांतील अंतर्गत तणाव पुन्हा एकदा उघड झाला आहे. भाजपच्या ज्येष्ठ आमदार मंदा म्हात्रे यांनी केलेल्या स्पष्ट आणि रोखठोक वक्तव्यामुळे नवी मुंबईतील राजकीय गणितांवर चर्चा रंगली आहे. “नाईक आणि आमचं वैर नाही, वैर आहे ते राजकारणाच्या खुर्चीसाठी,” असे सांगत त्यांनी संघर्ष वैयक्तिक नसून राजकीय असल्याचे ठामपणे मांडले. त्यांच्या या विधानामुळे भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्चस्वाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईतील सत्तासंघर्ष पुन्हा ऐरणीवर आला आहे.**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात भाजपकडून गणेश नाईक आणि मंदा म्हात्रे हे दोन अनुभवी चेहरे आहेत. त्याचबरोबर शिंदे गटाचेही शहरावर प्रभावी नियंत्रण आहे. मात्र भाजपच्या उमेदवार यादीत गणेश नाईक यांच्या समर्थकांना मोठे स्थान मिळाल्याने पक्षातील अंतर्गत असंतोष समोर आला. मंदा म्हात्रे यांना अपेक्षित संधी न मिळाल्याने निर्माण झालेला हा वाद केवळ वैयक्तिक नाराजीपुरता मर्यादित नसून, तो “कोणी किती नगरसेवक निवडून आणतो” या सत्तासमीकरणाशी थेट जोडलेला आहे. मंदा म्हात्रे यांनी केलेले वक्तव्य हे दोन महत्त्वाचे संकेत देते. पहिला, भाजपमधील गटबाजी अजूनही संपलेली नाही. तिकीट वाटपात समतोल न राखल्यास नाराजी उफाळून येते, हे पुन्हा अधोरेखित झाले. दुसरा, त्यांनी गणेश नाईक यांच्याबद्दल आदर व्यक्त करताना, त्यांच्या आजूबाजूच्या “गिरट्या घालणाऱ्या” लोकांवर अप्रत्यक्ष बोट ठेवले. याचा अर्थ संघर्ष थेट नेत्यांमध्ये नसून, नेतृत्वाभोवती तयार झालेल्या शक्तिकेंद्रांमध्ये आहे. राजकीयदृष्ट्या पाहता, नवी मुंबईत भाजप विरुद्ध शिवसेना (शिंदे गट) असा थेट सामना असतानाच भाजपमधील अंतर्गत स्पर्धा ही पक्षासाठी अधिक डोकेदुखी ठरू शकते. जर “सर्व कार्यकर्ते आपलेच” अशी भूमिका तिकीट वाटपात घेतली गेली नसल्यास, मतभेदांचा फटका थेट मतदानावर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकंदरीत, मंदा म्हात्रे यांचे विधान हे वैयक्तिक स्पष्टीकरण नसून, नवी मुंबईतील सत्तासंघर्षाचे वास्तव उघड करणारे आहे. येत्या निवडणुकीत ही अंतर्गत चढाओढ भाजपसाठी ताकद ठरणार की कमकुवत कडी, हे निकालच ठरवतील. भाजपच्या अनुभवी आमदार मंदा म्हात्रे यांनी केलेले वक्तव्य हे वैयक्तिक मतभेदांपेक्षा राजकीय प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या स्पर्धेकडे लक्ष वेधणारे ठरले आहे. “नाईक आणि आमचं वैर नाही,” असे स्पष्ट करत त्यांनी राजकारणातील नैसर्गिक स्पर्धा आणि नेतृत्वनिर्मितीतील चढाओढ यावर संयत भाष्य केले. त्यांच्या या भूमिकेमुळे नवी मुंबईतील राजकीय वातावरण अधिक व्यापक संदर्भात समजून घेण्याची संधी मिळते.

**स्पर्धात्मक वास्तव अधोरेखित**

मंदा म्हात्रे यांच्या वक्तव्यातून पक्षातील अंतर्गत मतभेदांपेक्षा राजकीय प्रक्रियेतील स्पर्धात्मक वास्तव अधोरेखित होते. “कोणी किती नगरसेवक निवडून आणतो” ही चढाओढ ही प्रत्येक पक्षात असते, असे त्यांनी सांगितले असून, ही बाब राजकारणातील सामान्य प्रक्रिया म्हणूनच पाहिली पाहिजे, असा संकेत त्यांनी दिला आहे. तसेच गणेश नाईक यांच्याबद्दल आदर व्यक्त करताना, नेतृत्वाभोवती असलेल्या विविध भूमिका आणि सल्लागारांच्या प्रभावाकडेही त्यांनी सौम्यपणे लक्ष वेधले आहे.

## भिवंडी मनपात सपा विरुद्ध सपा !

### आमदार रईस शेखांची काँग्रेस प्रचाराला उघड साथ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**दि.11 / भिवंडी :** भिवंडी पूर्व विधानसभा क्षेत्रातील अनेक प्रभागांमध्ये आमदार रईस शेख हे काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारात सक्रियपणे सहभागी होताना दिसत आहेत. मात्र या प्रचाराची पद्धतही तितकीच चर्चेची ठरते आहे. शेख प्रचारस्थळी येण्यापूर्वी उमेदवारांसह उपस्थित कार्यकर्त्यांना अंगावरील काँग्रेसची उपरणी बाजूला काढून ठेवावी लागत असल्याची चर्चा आहे. उघडपणे प्रचार करत असले तरी माध्यमांसमोर भूमिका मांडण्याबाबत शेख अद्याप सावध असून, “१६ तारखेनंतर निकालानंतर माझी भूमिका स्पष्ट करेन,” अशी मोघम प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे या वादाची पार्श्वभूमी अधिक खोल आहे. समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांना पत्र लिहून रईस शेख यांनी अबू आझमी यांच्या कार्यपद्धतीविरोधात नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर काल रात्री प्रभाग क्रमांक ९ मधील काँग्रेसच्या प्रचारसभेत शेख यांनी अचानक एन्ट्री घेतल्याने उपस्थित काँग्रेस कार्यकर्त्यांनाही “जोर का धक्का, धीरे से लगा” अशी परिस्थिती निर्माण झाली.

या सभेत सावधगिरी म्हणून व्यासपीठावरील काँग्रेस उमेदवारांसह अनेकांनी गळ्यातील काँग्रेसची उपरणी गुंडाळून ठेवली. दरम्यान, एका ठिकाणी काँग्रेसच्या निवडणूक चिन्ह असलेल्या ‘हात’ या चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन रईस शेख करत असल्याचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आहे. या व्हिडीओत शेख यांनी, “हिम्मत असेल तर समाजवादी पक्षाच्या उमेदवारांनी माझा फोटो न वापरता प्रचार करून निवडणूक लढवून जिंकून दाखवावी,” असे थेट आव्हान दिल्याचे दिसते.

या सगळ्या घडामोडींमुळे भिवंडीतील राजकीय समीकरणे झपाट्याने बदलत असून, समाजवादी पक्ष मधील अंतर्गत संघर्ष आता उघड फाटाफुटीच्या दिशेने जात असल्याचे चित्र आहे. एकीकडे सपा नेतृत्वावरील नाराजी, तर दुसरीकडे काँग्रेससोबतची जवळीक — या दुहेरी राजकारणामुळे भिवंडीतील निवडणूक लढत अधिकच रंगतदार आणि अनिश्चित बनली आहे. आगामी निकाल या संघर्षाचा राजकीय परिणाम किती खोल आहे, हे स्पष्ट करतील. भिवंडीतील ही घडामोड केवळ दोन नेत्यांमधील मतभेदापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर तिने समाजवादी पक्षातील अंतर्गत अस्वस्थता उघड केली आहे. आमदार रईस शेख यांची काँग्रेसकडे झुकलेली भूमिका आणि उघड प्रचारामुळे सपा नेतृत्वासमोर संघटनात्मक आव्हान उभे राहिले आहे. तर दुसरीकडे प्रदेशाध्यक्ष अबू आझमी यांच्या कार्यपद्धतीविरोधातील नाराजीही आता दबक्या आवाजात न राहता उघड चर्चेचा विषय बनली आहे. निवडणुकीच्या तोंडावर घडलेली ही फाटाफूट मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करणारी ठरू शकते, तर विरोधी पक्षांसाठी संधी ठरू शकते. वैयक्तिक नाराजी, पक्षनिष्ठा आणि निवडणूक गणित यांचा गुंता अधिकच वाढताना दिसत असून, १६ तारखेच्या निकालानंतर या संघर्षाची पुढील दिशा स्पष्ट होणार आहे. तोपर्यंत भिवंडीतील राजकारण तापलेलेच राहणार, यात शंका नाही. पक्षनिष्ठेपेक्षा स्थानिक राजकारणातील वर्चस्व आणि उमेदवारीचे गणित अधिक प्रभावी ठरत असल्याचे या घडामोडींमधून दिसून येते. नेतृत्वातील समन्वयाचा अभाव आणि अंतर्गत मतभेदांचा फटका थेट कार्यकर्ते व मतदारांना बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



# महापालिकांचा महासंग्राम

## वसई–विरारच्या राजकारणात हालचाल राजीव पाटील सक्रीय

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता /दि.11**

वसई–विरारच्या राजकारणात पुन्हा एकदा हालचालींना वेग आला असून, मागील काही महिन्यांपासून राजकीय पडद्यामागे असलेले माजी महापौर राजीव पाटील पुन्हा सक्रिय झाल्याचे चित्र दिसत आहे. बहुजन विकास आघाडीच्या संघटनात्मक कामात त्यांनी थेट बूथस्तरावर उतरत कार्यकर्त्यांशी संवाद साधल्याने, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या हालचालींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मागील काही महिन्यांपासून राजकारणापासून काहीसे अलिप्त राहिलेले माजी महापौर राजीव पाटील पुन्हा एकदा बहुजन विकास आघाडी मध्ये सक्रिय झाले आहेत. रविवारी त्यांनी वसई परिसरातील विविध बूथवर भेटी देत थेट कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यांच्या या सक्रियतेमुळे वसई–विरारच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले असून वसई–विरार महापालिका आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय समीकरणांमध्ये नेमका काय बदल होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## डीसीआरवरुन म्हस्के - नाईकांत आरोप– प्रतिआरोप

**महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विकासाच्या मुद्द्यावरून राजकीय आरोप–प्रत्यारोप तीव्र होताना दिसत आहेत. राज्य सरकारने लागू केलेल्या एकात्मिक विकास नियंत्रण नियमावलीवर (युनिफाईड डीसीआर) वनमंत्री गणेश नाईक यांनी केलेल्या टीकेला आता शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. “युनिफाईड डीसीआर म्हणजे भ्रष्टाचाराचे कुरण” असा आरोप नाईकांनी केल्यानंतर, म्हस्के यांनी हा आरोप फेटाळत नवी मुंबईच्या विकासावरून थेट नाईकांच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यामुळे नवी मुंबईत निवडणूक लढत ही केवळ राजकीय नसून, विकासाच्या संकल्पनांवर आधारित संघर्षात रूपांतरित होताना दिसत आहे.**

नवी मुंबईतील राजकारण सध्या दोन वेगवेगळ्या विकासदृष्टीकोनांमध्ये अडकले आहे. एकीकडे गणेश नाईक यांचा दावा आहे की युनिफाईड डीसीआरमुळे शहराचा नियोजनबद्ध विकास बिघडेल आणि भ्रष्टाचाराला चालना मिळेल. तर दुसरीकडे शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के हे आरोप केवळ राजकीय असूया आणि असंतोषातून होत असल्याचे सांगत आहेत. त्यांच्या मते, विरोधकांनी केवळ आरोप केले असून नवी मुंबईचा खऱ्या अर्थाने विकास त्यांनी कधीच केला नाही.

म्हस्के यांनी उपस्थित केलेला “वाईट हाऊस, ब्लॅक हाऊस आणि काही विशिष्ट लोकांची चांडाळ चौकडी” हा मुद्दा महत्त्वाचा आहे. या विधानातून त्यांनी अप्रत्यक्षपणे नवी मुंबईतील जुन्या सत्ताकेंद्रांवर बोट ठेवले आहे. विशेषतः गेल्या पाच वर्षांच्या प्रशासकीय राजवटीत नेमके कोण दादागिरी करत होते, कोणत्या अधिकाऱ्यांवर दबाव होता, याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी करून त्यांनी उत्तरदायित्वाचा मुद्दा ऐरणीवर आणला आहे. दोषी असतील तर कारवाई झालीच पाहिजे, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. पुनर्विकासाच्या मुद्द्यावर मात्र म्हस्के यांनी अधिक व्यावहारिक आणि समावेशक भूमिका मांडली आहे. नवी मुंबईतील लहान घरांमध्ये राहणारे गरीब, माथाडी कामगार आणि कामगार वस्त्यांतील नागरिक यांना सुरक्षित, मोठी घरे मिळणे गरजेचे असल्याचे ते सांगतात. मात्र पुनर्विकास हा ‘मोफत घर’ या भावनिक अपेक्षांवर चालू शकत नाही, हेही त्यांनी स्पष्ट केले. विकासकाला काही लाभ मिळाल्याशिवाय पुनर्विकास शक्य नाही, ही वास्तववादी भूमिका त्यांनी मांडली आहे.

याच पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली क्लस्टर योजना, एसआरए आणि एमआयडीसी भागातील झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाचा विचार सुरू असल्याचा दावा करण्यात आला आहे. मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये जीव मुठीत धरून राहणाऱ्या नागरिकांना सन्मानाने राहता येईल अशी घरे देणे हीच खरी समाजसेवा असल्याचे म्हस्के यांचे म्हणणे आहे.

एकंदरीत, नवी मुंबईतील हा वाद केवळ युनिफाईड डीसीआरपुरता मर्यादित नसून, “कोणाचा विकास, कशा पद्धतीने आणि कोणाच्या फायद्यासाठी?” या मूलभूत प्रश्नांभोवती फिरतो आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत हे मुद्दे मतदारांच्या कसोटीवर उतरणार असून, आरोपांच्या पलीकडे जाऊन कोणता विकासदृष्टीकोन नवी मुंबईसाठी अधिक विश्वासार्ह आहे, याचा फैसला मतदारच करणार आहेत.

# मुरबाडमध्ये वृद्ध शेतकऱ्याच्या शेतातील मातीची परस्पर बेकायदा विक्री ?



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण : माळशेज घाट परिसरात वसलेल्या तसेच मुरबाड तालुका अंतर्गत, कल्याण–नगर मार्गापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या फांगणे गाव येथील वयोवृद्ध शेतकरी मारुती सखाराम केदार (वय अंदाजे ८०) यांच्या शेतातील शेकडो ब्रास माती बेकायदा काढून विकल्याचा गंभीर आरोप त्यांचे पुत्र वंसत मारुती केदार यांनी केला आहे.**

याप्रकरणी ग्रामपंचायत व मुरबाड तहसील कार्यालयात तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे. वयोमानामुळे तसेच बायपास शस्त्रक्रिया झाल्याने मारुती केदार यांना नियमितपणे शेताकडे जाता येत नाही. त्यांची शेती गावापासून दीड ते दोन किलोमीटर अंतरावर असून, त्यांची मुले नोकरी व कामधंद्यानिमित्त कल्याण व टिटवाळा परिसरात वास्तव्यास आहेत. घरात केवळ पत्नी, नातू व स्वतः मारुती केदार राहत असल्याचा गैरफायदा घेत गावातीलच अशोक वामन केदार याने त्यांच्या मालकीच्या सर्वे नंबर ९४/१२, क्षेत्रफळ २२ गुंठे या शेतातून जेसीबीच्या सहाय्याने ५० ते ८० ट्रॅक्टर माती अनधिकृतपणे काढून जवळील विटभट्टी मालकाला विकल्याचा आरोप करण्यात आला आहे. या बेकायदा उत्खननामुळे शेतातील सुपीक माती पूर्णतः नष्ट झाली असून, शेती नापीक बनली आहे. त्यामुळे या वयोवृद्ध शेतकऱ्यावर उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, भोरांडे ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या फांगणे-भोरांडे, पेजवाडी, भोईरवाडी, उदाळडोह, दिवाणपाडा, आंबेगाव आदी गावांमध्ये मोठ्या प्रमाणात रेती व माती चोरी होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. महसूल विभागाकडून या प्रकाराकडे सोयीस्कर दुर्लक्ष होत असल्याने संबंधितांवर कारवाई होत नसल्याचेही ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

कोणतीही अधिकृत परवानगी नसताना ट्रॅक्टर, जेसीबी, डंपर व इतर वाहनांद्वारे खुलेआम माती व रेतीची वाहतूक सुरू असताना प्रशासनाला हे दिसत नाही का, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. येत्या १५ ते २० दिवसांत संबंधित भू-माफियांवर कारवाई न झाल्यास मुरबाड तहसील कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्याचा इशारा वंसत केदार यांनी दिला आहे. यासंदर्भात अभिजित देशमुख, तहसीलदार, मुरबाड यांना विचारले असता, संबंधित मंडल अधिकाऱ्यांना तात्काळ घटनास्थळी पाठवून माहिती घेऊन योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.



ठाणे ■ सोमवार

12 जानेवारी 2026

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




# 15 जानेवारी रोजी महापालिका निवडणुकीच्या मतदानासाठी सुट्टी आणि सवलत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार असून, या दिवशी महानगरपालिका कार्यक्षेत्रात सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग तसेच उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांनी याबाबतचे अध्यादेश निर्गमित केले आहेत. निर्णयाची या अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने मुंबई शहर, पूर्व उपनगरे आणि पश्चिम उपनगरे यांसाठी स्वतंत्र 'दक्षता पथके' स्थापन केली आहेत. मतदानाच्या दिवशी सुटी किंवा आवश्यक सवलत न दिल्यास संबंधित आस्थापनांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे. पालिका क्षेत्रातील केंद्र व राज्य शासनाची शासकीय व निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका आदींना ही सार्वजनिक सुटी लागू राहणार आहे. पालिका निवडणूक क्षेत्रातील मतदार शहराबाहेर कार्यरत असले तरी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी ही सुटी लागू राहील, असे अध्यादेशात स्पष्ट करण्यात आले आहे. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागानेही सार्वजनिक सुटीबाबत स्वतंत्र आदेश काढले असून, सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने, खासगी कंपन्या, निवासी हॉटेल्स, खाद्यगृहे, नाट्यगृहे, व्यापार व औद्योगिक उपक्रम, माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर्स, मॉल्स व रिटेलर्स यांनाही सुटी लागू राहणार आहे. मतदानाच्या दिवशी सुटी किंवा सवलत न दिल्यास दुकाने व आस्थापना खात्यामार्फत कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी मुंबई शहर, पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरे यांसाठी दक्षता पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

# निवडणूक प्रचार रिक्षांमुळे कल्याण-डोंबिवलीकर त्रस्त

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका निवडणूक प्रचाराने जोर घेतला असला तरी जनसामान्यांमध्ये फेस टू फेस घरोघरी प्रचार फेऱ्या तसेच नागरीकांच्या मनावर आपल्या प्रचाराचे चिन्ह बिंबविण्यासाठी उमेदवारांकडून प्रचारासाठी रिक्षा फिरविण्याकडे जास्त पसंती असते. मात्र दिवसभर प्रभाग पिंजून काढण्यासाठी गल्ली बोळात प्रत्येक उमेदवारांच्या प्रचाराच्या फिरणाऱ्या रिक्षांच्या गोंगाटाने नागरीकांच्या कामाच्या कानठळया बसल्या असून नागरिकांच्या दुपारच्या झोपेचे खोबरे होत असल्याने कुणी तरी या प्रचाराच्या रिक्षांना थोपवा असा संताप नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

अनेक प्रभागात आणि स्टेशन परिसरात रुग्णालये आहे. या रुग्णालयात रुग्ण उपचार घेत आहे. काही रुग्णांची प्रकृती ही नाजूक आहे. त्याचबरोबर शहरात अनेक ठिकाणी शाळा आहे. प्रचाराची रिक्षा फिरविली जाते. तेव्हा एकाच प्रभागातील एकापेक्षा जास्त उमेदवारांच्या प्रचाराच्या रिक्षा एकमेकांसमोर येऊन प्रचार करीत आहे. त्यामुळे प्रचाराचा गोंधळ आहे. या आवाजाने नागरीक त्रस्त झाले आहे. कल्याणमधील जागरुक नागरीक आणि व्यावसायाने वकिल असलेले नजीर उजे यांनी या संदर्भात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना तोंडी तक्रार केली आहे. प्रचाराच्या रिक्षा फिरत असल्याने ध्वनी प्रदूषण होत आहे. या ध्वनी प्रदूषणावर आचारसंहिता पथकाने कारवाई करावी. या कानठळया बसविणाऱ्या प्रचारावर निर्बंध घालण्यात यावेत अशी मागणी उजे यांनी केली आहे.

# अखंड हरिनाम सप्ताहात मतदान जनजागृतीचा गजर




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी स्वीप (SVEEP) उपक्रमांतर्गत शहरातील प्रभाग समित्यांमध्ये विविध उपक्रमांचे माध्यमातून व्यापक मतदार जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. याचे औचित्य साधून निवडणूक निर्णय अधिकारी सर्जेराव पाटील यांचे मार्गदर्शनाखाली संत वामनभाऊ महाराज सेवा मंडळ आणि लोकमान्य सावरकर नगर प्रभाग समिती, स्वीप उपक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने आईमाता मंदिर, सावरकर नगर, ठाणे येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात हरिनामाचे गजरात मतदान जनजागृती करण्यात आली. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदान हा प्रत्येक नागरिकाचा हक्क व कर्तव्य आहे, याची जाणीव उपस्थितांना करून देण्यात आली. कार्यक्रमात उपस्थित नागरिकांना मतदान प्रक्रिया, तसेच मतदानाचे सामाजिक महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली. तुमचे एक मत देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत मोलाचे आहे. असा संदेश गट प्रमुख राजेंद्र परदेशी यांनी दिल्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. हरिनाम सप्ताहात भजन, कीर्तन, प्रवचन यांच्या माध्यमातून भक्तीचा सोहळा रंगत असतानाच सामाजिक जागृतीची जोड मिळाल्याने उपस्थितांनीही समाधान व्यक्त केले. यावेळी अविनाश सावंत, श्री संत वामनभाऊ महाराज सेवा मंडळाचे अध्यक्ष शशिकांत दौंड, उपाध्यक्ष बाबासाहेब वाघ, सल्लागार गजानन आंधळे, रविंद्र खरमाटे, सिद्धीविनायक हॉस्पिटलचे संचालक डॉ. अमोल गीते, भालचंद्र घुगे, खजिनदार बाबासाहेब आंधळे, कार्याध्यक्ष शिवाजी जायभाये, सचिव भूषण भांगे सह परिसरातील भावीभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणूक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांचा टपाली मतदानास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणे (11) – निवडणूककामी कार्यरत असलेल्या व प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर काम करणाऱ्या सरकारी अधिकारी कर्मचारी तसेच पोलीस यांना त्यांचा मतदानाचा अधिकार बजावता यावा यांनी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

या टपाली मतदानाला अधिकारी कर्मचारी यांचा चांगला प्रतिसाद मिळत असून आतापर्यत एकूण 1945 टपाली मतपत्रिका निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्या असल्याचे आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांनी नमूद केले. ठाणे महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 साठी महापालिकेच्या 9 प्रभागसमितीनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक केली असून याच ठिकाणी टपाली मतपत्रिका देखील स्वीकारण्यात आजात आहे.

आतापर्यंत मतदानाचे दिवशी कार्यरत असणाऱ्या 1292 कर्मचारी तर 653 पोलीस कर्मचारी यांच्याकडून टपाली मतपत्रिका प्राप्त झाल्या आहेत. टपाली मतदानाची प्रक्रिया ही 12 जानेवारीपर्यत सुरू राहणार असून निवडणूक कामी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

टपाली मतपत्रिका स्वीकारताना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण प्रक्रिया पार पाडली जात असून, सुरक्षितता, नोंदणी व सीलबंद साठवणूक याबाबत विशेष दक्षता घेण्यात येत असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

# कवी नारायण सुर्वेंच्या कवितेवर आधारित रिल स्पर्धेचं आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** पु.ल. कट्टा कल्याण ही साहित्य, सांस्कृतिक , कला क्षेत्रात काम करणारी संस्था असून सदर संस्थेच्या वतीने विविध साहित्यिक सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येत असतात. २०२५-२०२६ हे वर्ष कविवर्य नारायण सुर्वे यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्याचे औचित्य साधून पु.ल. कट्ट्याने कवीवर्य नारायण सुर्वे यांना अभिवादन करण्याकरिता विविध उपक्रमाचे आयोजन केले आहे. त्यातीलच एक भाग म्हणजे कविवर्य नारायण सुर्वे यांच्या कोणत्याही एका कवितेवर आधारित रिल स्पर्धा. हि रिल स्पर्धा विनामूल्य असून स्पर्धकांनी कविवर्य नारायण सुर्वे यांच्या कोणत्याही एका कवितेवर आधारित चित्रीकरण करुन कवितेच्या ऑडिओसह ६० ते १२० सेकंद कालावधीचा चांगल्या ध्वनी गुणवत्तेसह उभ्या स्वरूपात रिल बनवून व्हिडिओ आपल्या स्वतःच्या ड्राइव्हवर अपलोड करुन त्याची लिंक pulkatta20@gimail.com या ईमेलवर दि ३० जानेवारी २०२६ पर्यंत पाठवावा असे आवाहन पु. ल. कट्टा संयोजक प्रा. महेंद्र भावसार यांनी केले आहे. विजयी स्पर्धकांना आकर्षक पारितोषिक व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात येणार असून पारितोषिक प्राप्त व निवडक रिल जन्मशताब्दी महोत्सव कार्यक्रमात दाखवण्यात येतील. अधिक माहितीसाठी ९८७०३२६६८८ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

# RSP अधिकारी पदावर कल्पेश शिंदे यांची नियुक्ती!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड-प्रतिनिधी**

पदमश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नति मंडळ भिवंडी संचलित तळेगाव विभाग हायस्कूल तळेगाव ता मुरबाड या विद्यालयाचे शिक्षक समुपदेशक आणि बिलघर गावचे सुपुत्र कल्पेश मनोहर शिंदे यांची पोलीस आयुक्तालय ठाणे यांच्या आदेशानुसार RSP अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.



शाळाशाळांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये आत्मरक्षा, जनसेवा, देशभक्तीची भावना वाढवण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये शिस्तबद्ध रीतीने राष्ट्रसेवेची इच्छा निर्माण करण्यासाठी, सामाजिक आणि सार्वजनिक सेवा कार्य करण्याचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी, कोणत्याही संकटाच्या वेळी देशाचे व स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम बनवण्यासाठी, विद्यार्थी व महाराष्ट्र पोलीस यांच्यातील दुवा म्हणजे RSP(Road Safety Petrol). रस्ता सुरक्षा दलात ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत वाहतूक पोलीस उपआयुक्त ठाणे शहर यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटन नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आर एस पी अधिकारी महाराष्ट्र राज्य म्हणून त्यांची नियुक्ती करून त्यांना RSP आणि CIVIL DEFENCE चे प्रशिक्षण व वर्दी देऊन सन्माननीय पोलीस उपआयुक्त श्री. पंकज शिरसाठ साहेब यांच्या शुभहस्ते शुक्रवार दिनांक 9 जानेवारी 2026 रोजी सन्मानित करण्यात आले.

सरांची RSP अधिकारी महाराष्ट्र राज्य म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे शालेय सल्लागार समितीचे चेअरमन अरुणबंधू चौधरी,सदस्य दीपक देशमुख, श्रीकांत देशमुख आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक वसंत महाले ,सौ फुलपगारे मॅडम,शिक्षक प्रतिनिधी मंगल कोळी ,जयश्री मॅडम, अक्षय ठाकरे , सेवक पंढरीनाथ देशमुख सर्व शिक्षक,सर्व पालक,सर्व विद्यार्थी,तळेगाव व बिलघर पंचक्रोशीतील पालकवर्ग यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कल्पेश शिंदे सर यांनी आपल्या पदमश्री संस्थेच्या व तळेगाव शाळेच्या, बिलघर गावच्या इतिहासात मानाचा तुरा रोवल्याबद्दल त्यांचे सर्वच स्तरातुन कौतुक होत आहे. आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# फेरीवाल्यांचे अतिक्रमण

## डोंबिवली पूर्व स्थानकाजवळ वाहतुकीचा बोजवारा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** - डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाजवळील डॉ. रॉथ रस्त्यासह इतर रस्ते गेल्या काही दिवसांपासून फेरीवाल्यांनी या रस्त्यांच्या मध्यभागी दुकाने लावून प्रवाशांसाठी बंद केले आहेत. दररोज संध्याकाळी सात ते रात्री उशिरापर्यंत फेरीवाले डॉ. रॉथ, उर्सेकरवाडी भागातील सर्वाधिक वर्दळीचे रस्ते बंद करून ठेवत असल्याने या भागातून वाहने नाहीच, पण पादचाऱ्यांना चालणे मुश्किल होत आहे.

पालिका अधिकारी निवडणूक कामात व्यस्त असल्याने त्याचा गैरफायदा फेरीवाले उठवत आहेत. ग प्रभागाच्या अंतर्गत डॉ. रॉथ, उर्सेकरकर वाडी, रामनगर वाहतूक शाखा रस्ता येतो. या प्रभागातील फेरीवाला हटाव पथकातील कामगार हे पालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयात सात वाजल्यापासून टिंगलटवाळ्या करत बसलेले असतात. अनेक पादचारी पालिका कार्यालयात येऊन ग प्रभाग फेरीवाला हटाव पथकातील कामगारांना डॉ. रॉथ रस्ता, मधुबन गल्ली रस्ता, उर्सेकरवाडी भागातील रस्ता, रामनगर वाहतूक शाखा ते स्वामी समर्थ मठ भागातील फेरीवाले रस्त्यावरून उठवा म्हणून मागणी करत आहेत.

**डोंबिवली पूर्वेकडील रेल्वे स्थानक परिसर सध्या फेरीवाल्यांच्या अतिक्रमणामुळे अक्षरशः कोंडीच्या विळख्यात सापडला आहे. रस्त्यांवर सर्रास दुकाने थाटल्याने पादचाऱ्यांना चालणेही मुश्किल झाले असून, वाहनांची ये-जा ठप्प झाली आहे. विशेष म्हणजे याच परिसरात असलेले वाहतूक पोलीस कार्यालयही कोंडीत अडकले असून, अतिक्रमणाविरोधात कारवाई करणाऱ्या यंत्रणाच अडचणीत सापडल्याचे चित्र आहे. दररोज हजारो प्रवासी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना रेल्वे स्थानक परिसरातून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. रस्त्यावर फेरीवाल्यांनी दुकाने थाटल्यामुळे चालण्यासाठी जागाच उरलेली नाही. अरुंद झालेल्या रस्त्यांवरून वाट काढताना पादचाऱ्यांना वाहनांच्या धोक्यातून जावे लागत असून, रोजची ही कसरत आता नागरिकांसाठी नित्याची डोकेदुखी ठरत आहे.**




# जेष्ठ नागरिक सेवा संस्थेतर्फे कल्याण पूर्वेत मतदान जनजागृती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : महापालिका निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने अनेक उपक्रम राबविले जात असून विविध प्रकारे जनजागृती केली जात आहे. अशातच कल्याण पूर्वेतील जेष्ठ नागरिक सेवा संस्थेतर्फे मतदान जनजागृती अभियान फेरी काढण्यात आली. या फेरीला संस्थेच्या कार्यलयापासून सुरवात होऊन ड प्रभाग समिती कार्यालयामार्गे तिसगाव नाका, म्हसोबा चौक ते संस्थेचे कार्यलय कोळसेवाडी येथे सांगता झाली. या अभियानास जेष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोठ्या संख्येने सभासद सहभागी झाले होते. हे अभियान यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष कालिदास कदम सचिव डी. आर. उंरकर, उपाध्यक्ष दुधराम सहारे, बाळसाहेब बागुल, कार्याध्यक्ष प्रकाश देसाई, खजिनदार केशव जाधव, सहसचिव वासुदेव वाडे, संस्थापक एम. जी. कवडे, के. एल. वासनकर, शशिकांत आंबेरकर आदींनी परिश्रम घेतले. तर या अभियानास केडीएमसीचे अधिकारी विजय सरकटे यांचे सहकार्य लाभले.

# आदिवासी मजुरांची अमानुष हेळसांड

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

पालघरच्या ग्रामीण आदिवासी भागातील अनेक मजूर कामासाठी स्थलांतर होत आहेत. सध्या गांपाड्यावर नवीन रस्ते तयार करणे, दुरुस्ती आदी कामासाठी अनेक मजूर आपल्या मुलाबाळासह कामानिमित्त बाहेर गावी जात आहेत. मात्र बाहेर मजुरीसाठी गेल्यावर त्यांना त्यांचा संसार उघड्यावर मांडावा लागतो. सध्या खंबाळे-वनईदाभोण रस्त्यावरील वनई मेढीपाडा ते वाणीपाडा दरम्यान जिल्हा परिषद अंतर्गत खडीकरण व डांबरीकरणाचे काम सध्या सुरू आहे. हा रस्ता परिसरातील नागरिकांसाठी निश्चितच सोयीचा ठरणार असला, तरी या विकासकामाच्या आड आदिवासी मजुरांवर होत असलेली अमानुष वागणूक संतापजनक ठरत आहे.

# तब्बल 25 वर्षांनंतर वढाव येथे सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

**पेण (प्रतिनिधी)**

**पेण** : पेण खारेपाटातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वढाव येथे तब्बल २५ वर्षांनंतर सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ही शाळा विभागातील नावलौकिक असलेली असून, बंद पडण्याच्या मार्गावर असताना गावातील तरुणांनी एकत्र येत शाळेला नवसंजीवनी देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.





शाळेची पटसंख्या वाढवून नवीन इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. हा क्षण संपूर्ण गावासाठी समाधानाचा ठरला. "गाव करी ते राव काय करी" या उक्तीप्रमाणे समाजासाठी एक सकारात्मक संदेश या माध्यमातून देण्यात आला.

कार्यक्रमात चिमुकल्यांनी सादर केलेली नृत्ये, गीते व विविध कला सादरीकरणांनी उपस्थित रसिकांची मने जिंकली. या सांस्कृतिक कार्यक्रमामुळे कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद माजी सदस्य प्रभाकर म्हात्रे, शिवसेना (उबाठा) तालुका प्रमुख समीर म्हात्रे, चेअरमन चंद्रहास म्हात्रे, बी. जी. ठाकूर विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक सी. आर. म्हात्रे, माजी मुख्याध्यापक अजित ठाकूर, वसंत रघुनाथ म्हात्रे, सुरेश म्हात्रे, अनिल गुरुजी, संदीप, रवींद्र म्हात्रे, मारुती म्हात्रे, चंद्रकांत म्हात्रे, रमेश म्हात्रे, किशोर म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व ईशस्तवनाने झाली. यानंतर मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. बंद पडण्याच्या मार्गावर असलेली शाळा आज JSW कंपनीच्या सहकार्याने नवीन इमारतीत उभी राहत असल्याचे सांगून गावातील तरुण व ज्येष्ठ नागरिकांनी समाजापुढे आदर्श निर्माण केल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा व्यवस्थापन समिती, सल्लागार समिती, राधा कृष्ण सोसायटी, मुख्याध्यापक, शिक्षिका, ग्रामस्थ, ग्रामस्थ मंडळ वढाव यांनी विशेष परिश्रम घेतले. मान्यवर व प्रेक्षकांनी सर्व आयोजकांचे कौतुक केले.








# पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कल्याणमध्ये पोलिसांचा रुटमार्च

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कल्याण पश्चिमेत पोलिसांच्या वतीने रूटमार्च काढण्यात आला. कल्याण मधील महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन आणि बाजारपेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत हा रूटमार्च काढण्यात आला. या मार्चमध्ये 100 हून अधिक अधिकारी कर्मचारी सहभागी झाले होते. जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न असून विशेषता संवेदनशील ठिकाणी हा रूटमार्च काढण्यात आला. नागरिकांनी भयमुक्त वातावरणात आपला लोकशाहीतील मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी केले.


Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024